# पनवेल महानगरपालिका

## ता.पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. :०२२- २७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२- २७४५५७५१ आयुक्त कार्यालय:०२२- २७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट:www.panvelcorporation.com


दि. ०१/०८/२०२४

## उमेदवारांकरीता सूचना

**विषय : पनवेल महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध झालेल्या निवडसूचीत नमूद उमेदवारांचे दस्तऐवज पडताळणीबाबत.**

पनवेल महानगरपालिका सरळसेवा पदभरती-२०२३ अंतर्गत दि.०८.१२.२०२३ ते ११.१२.२०२३ या कालावधीत घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेत प्राप्त गुणानुक्रमानुसार सामाजिक व समांतर आरक्षण तसेच समान गुण मिळालेल्या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी विचारात घेऊन निवडसूची पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली.

सोबतच्या तक्त्यातील प्रतिक्षा यादीत नमूद असलेल्या उमेदवाराने ऑनलाईन अर्जात अपलोड केलेले दस्तऐवज जसे शैक्षणिक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र, वयाबाबत पुरावा, अधिवास प्रमाणपत्र व इतर सर्व दस्ताऐवज यांची मुळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकित प्रतीसह स्वत: (प्रतिनिंधी चालणार नाही) दस्तऐवज पडताळणीकरीता मंगळवार दि.१३/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता पनवेल महानगरपालिका (मुख्यालय), पनवेल येथे समक्ष उपस्थित रहावे.

दस्ताऐवज पडताळणीचे वेळी उमेदवाराने स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेला ओळखीचा पुरावा, स्वत:चे आधारकार्ड व त्याची स्वसाक्षांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने आरक्षित जागेकरीता अर्ज केला असल्यास त्या पुष्ठर्थ आवश्यक असलेली मुळ प्रमाणपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच अर्जासोबत सादर केलेली माहिती व अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रांच्या अनुषंगाने उमेदवाराने सोबत आणावयाची मुळ कागदपत्रे खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| १ | २ |
| १ | एस.एस.सी प्रमाणपत्र |
| २ | पदास आवश्यक असलेले शैक्षणिक अर्हतेची पूर्तता करीत असलेबाबत तसेच आवश्यक अर्हतेपेक्षा जास्त शैक्षणिक अर्हता असल्यास त्याबाबत गुणपत्रिका व प्रमाणपत्रे. |
| ३ | वयाचे पुराव्याबाबत जाहिरात शुध्दीपत्रक क्र.१ मध्ये नमूद पुरावा दर्शविणारे प्रमाणपत्र. |
| ४ | उमेदवार मागास प्रवर्गातील असल्यास संबंधित जात प्रमाणपत्र. |
| ५ | अनूसुचित जमाती प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवाराचे जात वैधता प्रमाणपत्र. |
| ६ | वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र. |
| ७ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र. |
| ८ | पात्र माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र. |
| ९ | खेळाडू आरक्षणाकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र. |

| अ.क्र. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| १ | २ |
| १० | अनाथ आरक्षणकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र. |
| ११ | पदवीधर अंशकालीन आरक्षणाकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र. |
| १२ | भुकंपग्रस्त आरक्षणाकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र. |
| १३ | प्रकल्पग्रस्त आरक्षणाकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र. |
| १४ | उमेदवाराचे नावात बदल असल्यास विवाह नोंदणी दाखला अथवा राजपत्र इत्यादी. |
| १५ | महाराष्ट्र राज्याचा अधिवास असल्याबाबत महाराष्ट्रातील जन्म दाखला / डोमिसाईल प्रमाणपत्र. |
| १६ | ज्या पदाकरीता अनुभव आवश्यक आहे अथवा अनुभवास प्राधान्य आहे अशा पदाकरीता उमेदवाराने अनुभव नमूद केला असल्यास -<br>१. नियोक्त्याने दिलेला नियुक्ती आदेश<br>२. नियोक्त्याने दिलेले अनुभव प्रमाणपत्र<br>३. अनुभव कालावधीतील सर्व वेतन चिठ्ठी (पेमेंट स्लिप) ज्यात उमेदवाराचा आयडी क्रमांक व बँकेचे नाव नमुद असेल..<br>४. अनुभव कालावधीतील उमेदवाराचे वेतन जमा झाल्याचे नोंद असलेले बँक पासबुक अथवा बँक स्टेटमेंट. |

उमेदवार विहीत शैक्षणीक अर्हता व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा दस्तऐवज पडताळणीकरीता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास उमेदवारास निवडीसाठी अपात्र करण्यात येईल व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

उपरोक्त नमूद दिवशी दस्तऐवज पडताळणीकरीता उपस्थित न राहिल्यास उमेदवारास नियुक्तीची आवश्यकता नाही असे गृहीत धरुन निवड रद्द केली जाईल व तद्नंतर या संदर्भात होणाऱ्या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

दस्तऐवज पडताळणीकरीता उमेदवाराने स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे असून दस्तऐवज पडताळणी प्रक्रियेबाबत मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहिल व तो उमेदवारावर बंधनकारक राहील.

| अनु. क्र. | अर्ज क्र. | उमेदवाराचे नाव | पदनाम | गट |
|---|---|---|---|---|
| 1. | 1055633 | PRAVIN RANGANATH GHOLAP | उपमुख्य अग्निशमन अधिकारी | ब |

**(कैलास गावडे)**
**उप आयुक्त (मुख्यालय)**
**पनवेल महानगरपालिका.**